जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात महाराणा प्रताप जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महाराणा प्रताप जयंतीनिमित्त मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, गजानन पळसे, सुरेश बंडगर, अनिल साळोखे, यशोधन बोकील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 MAY 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले.

# शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, उपकुलसचिव गजानन पळसे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, अनिल साळोखे, यशोधन बोकील यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2025
पुढारी

# विद्यापीठात महाराणा प्रताप जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, उपकुलसचिव गजानन पळसे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2025
लोकमत

# क्विक Update

## विद्यापीठात महाराणा प्रताप जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, उपकुलसचिव गजानन पळसे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, अनिल साळोखे, यशोधन बोकील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ३१७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ३१७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.




विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बीए, एमबीए, डी.फार्मसी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर, डिप्लोमा कोर्स इन इन्स्ट्रूमेंटल कोर्स, डिप्लोमा इन टॅक्सेशन, पी.जी. डिप्लोमा इन शेरीकल्चर आदी ३९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७१ केंद्रावर झाल्या. परीक्षेला ५ हजार १०५ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २९ रोजी पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईटस्, बी.व्होक, बीसीए, एमएस्सी डेटा सायन्स, एमएस्सी फूड सायन्स अँड न्यूट्रीशन आदी २७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2025
सकाळ

# अहिल्यादेवी होळकरांवरील दोन ग्रंथांचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दोन पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी (ता. ३१) सकाळी दहा वाजता व्यवस्थापन परिषद सभागृहात करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनाच्या वतीने नियोजित ग्रंथमालेंतर्गत डॉ. मच्छिंद्र गोफणे आणि डॉ. नीलेश शेळके लिखित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: जीवन आणि कार्य' हा ग्रंथ आणि दत्तात्रय भैरवनाथ घुटूगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.